# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक १३ मार्च, २०२५ / फाल्गुन २२, १९४६ (शके)

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**<br>**(३) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**<br>**(५) पणन, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(६) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री**<br>**(७) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री**<br>**(८) वस्त्रोद्योग मंत्री**<br>**(९) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---

### धाराशिव जिल्ह्यातील शाळांमध्ये अत्याधुनिक शिक्षण प्रणाली कार्यान्वित करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१) * ७९२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद शाळांमध्ये डिजिटल स्कूल संकल्पना राबवून अत्याधुनिक शिक्षण उपलब्ध करून देणे या कामासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांना आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२०२३ अंतर्गत रक्कम रूपये ६९.३० लक्ष इतके अनुदान जिल्हाधिकारी, धाराशिव यांचेमार्फत दिनांक ३० मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास उपलब्ध करून देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी उपरोक्त उपक्रमाची अंमलबजावणी केली नसल्याने जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना डिजिटल स्कूल संकल्पना या अत्याधुनिक शिक्षण प्रणालीपासून वंचित ठेवल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी अद्यापपर्यंत डिजिटल स्कूल संकल्पना न राबविण्याची कारणे काय आहेत तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये किती कालावधीत डिजिटल स्कूल ही अत्याधुनिक शिक्षण प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच

सदर डिजिटल स्कूल संकल्पना राबविण्यास विलंब करणाऱ्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव तसेच अन्य संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना अत्याधुनिक शिक्षण उपलब्ध करून देण्याकरीता डिजीटल स्कुल संकल्पना राबविणे अंतर्गत दिनांक ३०/०३/२०२३ रोजी मंजूर रुपये ६९,३०,०००/- पैकी ५० टक्के निधीचे वितरण दिनांक ०८/१०/२०२३ रोजी करण्यात आले आहे. याबाबत प्रसिध्द करण्यात आलेली निविदा तांत्रिक कारणास्तव तसेच लोकसभा व विधानसभा निवडणूकांच्या आदर्श आचारसंहितेमुळे अंमलबजावणी करता आलेली नाही. सदर निधी अखर्चित असल्याने लगतच्या वर्षात खर्च करण्यास जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी दिनांक ०१/०१/२०२५ अन्वये अनुमती दिली आहे. त्यानुसार, दिनांक २१/०१/२०२५ रोजी नव्याने निविदा प्रकाशित केली असून जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठीअत्याधुनिक शिक्षण प्रणाली कार्यान्वित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रकरणी झालेल्या विलंबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, धाराशिव यांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांतील शिपाई पदे व्यपगत करण्यात आल्याबाबत

**(२)** * **५२६ श्री.इद्रिस नायकवडी, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित / अंशत:अनुदानित प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिपायांची रिक्त पदे व्यपगत करून त्याऐवजी शिपाई भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे, शिपाई भत्ता अपुरा असल्याने शिपाई या पदावर कायमस्वरूपी काम करणेसाठी कर्मचारी उपलब्ध होत नाहीत, तसेच तात्पुरत्या स्वरूपात काम करणारे कर्मचारी कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाहीत व त्यांना जबाबदार धरता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेमध्ये कंत्राटी स्वरुपात असलेले काही कर्मचारी तथा काही शिक्षकांव्दारे लहान मुलींचा विनयभंग केल्याच्या घटना वारंवार घडत आहेत, या घटनांमध्ये संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल होतो, मात्र ज्या शाळेत ही घटना घडली त्या शाळांवर कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळेत कुठलीही चुकीची घटना घडल्यास संबंधित शाळेला जबाबदार धरले जात नाही व तसेच कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात असलेले कर्मचारी कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाहीत व त्यांना जबाबदार धरता येत नाही हीच परिस्थिती बदलापूर व तत्सम प्रकरणात दिसत असून शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संरक्षणाचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुला-मुलींच्या संरक्षणाची बाब लक्षात घेता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिपायांची पदे नियमित करून पूर्वीप्रमाणेच कायमस्वरूपी शिपाई पदभरती करणेबाबत तसेच यासंदर्भात विद्यार्थ्यांच्या संरक्षणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. ज्या शाळांमध्ये अशी घटना घडते त्या शाळेतील शिक्षक किंवा मुख्याध्यापक यांनी वेळीच त्याबाबत आवश्यक कार्यवाही केली नाही तर संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येते.
(३) हे खरे नाही. अशा घटनांबाबत राज्यशासन अत्यंत संवेदनशील असून अशा प्रकरणांमध्ये दोषी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांच्याविरुध्द POSCO कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येतो. तसेच आवश्यकतेनुसार प्रशासकाची नियुक्ती देखील करण्यात येते. या कार्यवाहीमध्ये नियमित कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी असा भेद केला जात नाही.
(४) राज्यातील सर्व शाळांतील विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत दिनांक २७/०९/२०२४ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय दिनांक २६/०९/२०२४ अन्वये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने सेवानिवृत्त न्यायाधीश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नक्षलग्रस्त प्रोत्साहन भत्ता व थकबाकी मिळण्याबाबत

**(३) * ५५५ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली व चंद्रपूर हे जिल्हे नक्षलग्रस्त,आदिवासी बहुल असल्याने दिनांक ६ ऑगस्ट, २००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यात कार्यरत सर्व विभागाच्या शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाच्या १५ टक्के प्रोत्साहन भत्ता दिला जात असून चंद्रपूर जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, उच्चश्रेणी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांना नक्षलग्रस्त १५ टक्के प्रोत्साहन भत्ता थकबाकी निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली नक्षलग्रस्त जिल्ह्यात सातवा वेतन आयोग लागू असून १५ टक्के प्रोत्साहन भत्ता हा आजही पाचव्या वेतन आयोगानुसार दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १५ टक्के प्रोत्साहन भत्ता

सातव्या आयोगातील मूळ वेतनानुसार मिळण्याबाबत तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, उच्चश्रेणी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांना नक्षलग्रस्त १५ टक्के प्रोत्साहन भत्त्याची थकबाकी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथील रिट याचिका क्रमांक ५०६३/२०२४ दिनांक ०१/१०/२०२४ यांचे आदेशानुसार माहे ऑक्टोबर, २०२४ पासून सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीवर परंतु रुपये १५००/- च्या कमाल मर्यादेत राहून नक्षलग्रस्त १५ टक्के प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे.
(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.५०६३/२०२४ मधील आदेशानुसार रुपये १५००/-च्या कमाल मर्यादेत माहे ऑक्टोबर २०२४ पासून प्रोत्साहन भत्ता नियमित वेतनात देण्यात येत आहे. पात्र कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्त्याची रक्कम थकबाकीसह विहित वेळेत मिळावी याकरीता गडचिरोली जिल्हा परिषदेच्या मागणीच्या अनुषंगाने व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद गडचिरोली करीता नक्षलग्रस्त भागात कार्यरत असेपर्यंत शिक्षकांना प्रोत्साहन भत्त्याच्या थकबाकीची रक्कम नियमानुसार उपलब्ध अनुदानातून अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची देयके शालार्थ प्रणालीत ऑनलाईन सादर करण्याबाबत

**(४) * ३६५ श्री.किरण सरनाईक, श्री.सत्यजीत तांबे, श्री.विक्रांत पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २०२४-२५ मधील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांशी संबंधित सर्व थकीत देयके संबंधित शाळांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत शालार्थ प्रणालीत ऑनलाईन सादर करण्याचे निर्देश दिले असूनही अडीच महिने उलटूनही अद्यापही थकीत देयके शालार्थ प्रणालीत ऑनलाईन सादर केली नसून अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत तासिका तत्वावरील शिक्षकांना १५० रुपये प्रति तासप्रमाणे मानधन देण्यात येत असल्याने घड्याळी तासिका तत्त्वावरील प्राध्यापक तसेच रजा कालावधीत नेमलेल्या शिक्षकांचे मानधन थकीत असून या शिक्षकांचे वेतन अद्यापही ऑफलाईन प्रणालीद्वारे अदा करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर सर्व प्रकारच्या शिक्षकांचे वेतन व इतर देयके शालार्थ प्रणालीतून ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात येतात त्याचप्रमाणे तासिका शिक्षकांचे वेतन ऑनलाईन करण्याबाबतच्या सुचना शिक्षण संचालनालयाने अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांना दिल्यामुळे गेल्या वर्षभरापासून राज्यभरातील तासिका तत्वावरील शिक्षकांचे मानधन प्रलंबित असून घड्याळी तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडी नसल्याने त्यांची चालू वर्षातील देयके कशी द्यावीत याबाबतचे मार्गादर्शन शिक्षण संचालकाकडून करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माध्यमिक संलग्न उच्च माध्यमिक शाळा व वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक येथील घड्याळी तासिकेवरील शिक्षकांच्या मानधनामध्ये तफावत असून तासिका तत्वावरील प्राध्यापक तसेच रजा कालावधीत नेमलेल्या शिक्षकांना राखीव रजांचा लाभ सेवानिवृत्तीच्या काळात मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, घड्याळी तासिका तत्त्वावर कार्यरत शिक्षकांचे प्रलंबित मानधन अदा करणे तसेच मानधन वाढविणे व शिक्षकांना शालार्थ प्रणालीत समाविष्ट करून त्यांचेही वेतन ऑनलाईन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) राज्यातील अनुदानित व अंशत: अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील नियमित व वैयक्तिक मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडी अनुज्ञेय आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील तासिका तत्वावरील शिक्षक हे नियमित शिक्षक नसल्याने त्यांना शालार्थ आयडी अनुज्ञेय नाही. त्यामुळे त्यांचे वेतन शालार्थ प्रणालीव्दारे ऑनलाईन अदा करण्यात येत नाही.
(३) तासिका तत्वावरील तसेच रजा कालावधीतील शिक्षकांची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना कोणत्याही रजा रोखीकरण अथवा इतर लाभ मिळत नाही.
(४) व (५) माध्यमिक संलग्न उच्च माध्यमिक शाळा व वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील घड्याळी तासिकेवरील शिक्षकांचे मानधन समान असून ते निश्चित करण्यात आले आहे. घड्याळी तासिका तत्वावरील व रजा कालावधीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त कर्मचारी यांची नियुक्ती तात्पुरत्या कालावधीसाठी कंत्राटी स्वरुप व मानधन तत्वावरील असल्याने संबंधित कर्मचारी यांचे मानधन अदा करण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## गंगापूर सहकारी साखर कारखान्याच्या उपसा सिंचन योजनेच्या थकबाकीबाबत

**(५) * २३६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर सहकारी साखर कारखाना (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील ५ सिंचन योजना उभारण्यासाठी व दैनंदिन खर्चासाठी साखर कारखान्याने रुपये ५५०.०० लक्ष खर्च केला असून सदर योजना कार्यान्वित करुन ७००० हेक्टर जमीन ओलिताखाली आली असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक लाभ झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साखर कारखान्याच्यावतीने सहकार न्यायालयात दावे करुन जलसिंचन योजनेची मालमत्ता ताब्यात घेतली असून साखर कारखान्याने या योजनेवर केलेल्या खर्चाची रक्कम व व्याज मिळून रुपये ११७५.०० लक्ष रक्कम थकीत असल्याने उपसा सिंचन योजना सध्या बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, साखर कारखान्याने या योजनेवर केलेल्या खर्चाची रक्कम व व्याज मिळून रुपये ११७५.०० लक्ष थकीत रक्कम देण्याच्या अनुषंगाने तसेच सदर उपसा सिंचन योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, गंगापूर सहकारी साखर कारखाना मु. रघुनाथनगर, ता.गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर या सहकारी साखर कारखान्याच्या दिनांक ३१ मार्च, २०२४ आर्थिक पत्रकात कारखान्याने सदर योजनेवर खर्च केलेली रक्कम रुपये ५२९.८६ लाख गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन संस्था संघ यांचेकडून येणे दर्शविलेली आहे.

कारखान्याने पुरस्कृत केलेल्या एकूण ७ उपसा जलसिंचन योजनेद्वारे शेतकऱ्यांची एकूण ६९१५.३७ हेक्टर जमीन ओलीताखाली आलेली होती. कालांतराने सदर ७ उपसा जलसिंचन योजना बंद पडल्या असून सद्य:स्थितीत अवसायनात आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे,

गंगापूर सहकारी साखर कारखान्याने मा.सहकार न्यायालयात दावे दाखल करून दाव्याद्वारे सदर ७ उपसा जलसिंचन योजनांची मालमत्ता ताब्यात घेतलेली आहे. गंगापूर सहकारी साखर कारखान्याच्या दिनांक ३१/०३/२०२४ आर्थिक पत्रकात गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन संस्था संघ यांच्याकडून येणे व्याज दर्शविलेले नाही. सदर ७ उपसा जलसिंचन योजना सद्य:स्थितीत बंद असून अवसायनात आहेत.

(३) गंगापूर सहकारी साखर कारखान्याने या योजनेवर केलेल्या खर्चाची व दिनांक ३१/०३/२०२४ अखेरचे आर्थिक पत्रकात गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन संस्था संघ यांच्याकडून येणे दर्शविलेली मुद्दल रक्कम रुपये ५२९.८६ लाख व त्यावरील व्याज रक्कम प्राप्त होण्याच्या दृष्टीने कारखान्याने आज अखेर प्रस्ताव सादर केलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही विशेष शिबिरात करण्याबाबत

**(६) * ७२८ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संच मान्यतेची प्रक्रिया संपल्यानंतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांना मान्यता देण्याची परिपूर्ण कार्यवाही विशेष शिबीर घेऊन तेथेच करावी, असे शासनाचे आदेश असून प्रत्यक्षात नियुक्त्यांना शिबीरात मान्यता दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही शासकीय कार्यालयातच पूर्ण करण्यात येत असल्यामुळे नियुक्त्यांना मान्यता देण्याबाबत भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला जात असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही वर्षांपूर्वी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात १५-१५ दिवसांचे तीन शिबीरे घेऊन मुंबईतील उच्च माध्यमिक स्तरावरील नियुक्त्यांना पारदर्शक आणि भ्रष्टाचार मुक्त पध्दतीने मान्यता देण्याची प्रक्रिया पूर्ण केली जात होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिबीरात सर्वासमक्ष वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव तपासून मान्यता देण्याची कार्यवाही न करणाऱ्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अनेक संस्थांकडून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करून त्यांच्या मान्यतेचे परिपूर्ण प्रस्ताव विहित कालावधीत सादर केले जात नव्हते व त्रुटीपूर्तता देखील लवकर केली जात नसल्याने पूर्वी शिबिरांचे आयोजन करून मान्यता देण्यात येत होत्या. तथापि, शासन निर्णय दिनांक २३/०६/२०१७ पासून पवित्र प्रणालीद्वारे भरती प्रक्रिया राबविली जाते. पवित्र प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या नियुक्त्यांना मान्यता देण्याची आवश्यकता नसल्याने शिबिरांचे आयोजन करण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती, वैयक्तिक मान्यता, पदोन्नत्या इ.बाबत शासन निर्णय दिनांक ०६/०२/२०१२ व दिनांक १०/०६/२०२२ मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन पवित्र प्रणाली व्यतिरिक्त होणाऱ्या नियुक्त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित कार्यालयात करण्यात येते. तसेच वैयक्तिक मान्यता देताना अनियमितता आढळल्यास संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी करण्याची तरतूद सदरहू शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात स्वस्त धान्य वितरण व्यवस्थेतील तांत्रिक अडचणींमुळे शिधापत्रिकांधारकाना धान्य मिळत नसल्याबाबत

**(७) * ५७७ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५ पासून शासनमान्य स्वस्त धान्य दुकानातून गरजू लोकांपर्यंत धान्य वितरण करण्यासाठी आरसीएमएस या ऑनलाईन प्रणालीमधून ई-पॉस मशिनवर बायोमेट्रिक पध्दतीचा अवलंब केला असून, सदर प्रणालीच्या अकार्यक्षमतेमुळे शिधापत्रिकाधारकांना हक्काचे धान्य मिळविण्यासाठी रेशन दुकानांत वारंवार जावे लागत आहे, तसेच अकोला जिल्ह्यातही शिधापत्रिकासंबंधी कामकाज करणारी आरसीएमएस ऑनलाईन प्रणाली (रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टम) बंद पडल्याने, जिल्ह्यातील पुरवठा कार्यालयाचे ऑफिस लॉगिन संबंधित सर्व अर्ज व इतर कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोंदणी करूनही स्वस्त धान्य दुकानदारांना धान्यपुरवठा वेळेत होत नसून महिन्याच्या शेवटच्या चार दिवसांत धान्य दिले जात असल्यामुळे सर्व लाभार्थीना धान्य वाटप करणे सहज शक्य होत नाही, पुणे जिल्ह्यातील ई-पॉस मशिनमधील तांत्रिक अडचणींमुळे मोफत धान्याचे वितरण रखडल्याने लाखो शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळाले नसल्याने हे धान्य माहे जानेवारी, २०२५ मध्ये वितरण करण्याची मुभा स्वस्त धान्य दुकानदार महासंघाने शासनाकडे केली असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरसीएमएस ऑनलाईन ही पुरवठा विभागाची वेबसाईट तांत्रिक कारणास्तव वारंवार बंद पडत असल्याने नवीन शिधापत्रिका तसेच जिल्ह्यातील प्राधान्य गट, अंत्योदय गट लाभार्थी नागरिकांना अनेक अडचणी येत असून ई-पॉस मशिनमध्ये ग्राहकांच्या बोटांचे ठसे न जुळणे, सर्व्हरमध्ये वारंवार होत असलेले तांत्रिक बिघाड, इंटरनेट जोडणीत येत असलेला व्यत्यय इ. अडचणींमुळे अनेक जिल्ह्यातील सुमारे २४ लाख शिधापत्रधारकांना धान्य मिळालेले नसल्याने लाभार्थ्यांनी ऑफलाईनद्वारे धान्य वितरण करण्याची मागणी जिल्हा पुरवठा विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुरवठा विभागाचे आरसीएमएस पोर्टल मधील (ऑनलाइन प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी) तांत्रिक दोष दूर करुन लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना धान्य वितरण करण्याबाबत कोणती उपाययोजना / कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यात सन २०१८ पासून सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. विभागातील RCMS व AePDS व इतर प्रणाली केंद्र शासनाच्या NIC क्लाउडवर स्थलांतरीत (Cloud Migration) करण्याची प्रक्रिया माहे डिसेंबर, २०२४ मध्ये सुरु असल्याने ई-पॉस मशिनद्वारे अन्नधान्य वितरणास व शिधापत्रिकासंबंधित ऑनलाईन कामकाज करतांना तांत्रिक अडचणी आल्या. तसेच, केंद्र शासनाच्या आधार प्रणालीमध्ये देशपातळीवर तांत्रिक समस्या असल्याने लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करतांना अडचणी आल्या.
(२) हे अंशत: खरे आहे. माहे डिसेंबर, २०२४ मधील प्रलंबित असलेल्या शिधापत्रिकाधारकांचे धान्य वितरण पूर्ण करण्यासाठी कॅरी फॉरवर्ड सुविधा उपलब्ध करुन देण्याची विनंती अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ, पुणे यांनी केली आहे.
(३) हे अंशत: खरे आहे. तांत्रिक अडचणींमुळे ऑफलाईन धान्य वाटपासाठी परवानगी मिळण्याचे निवेदन डिसेंबर, २०२४ मध्ये जिल्हा पुरवठा कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(४) सद्य:स्थितीत विभागातील प्रणालींचे Cloud Migration ची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ मध्ये सरासरी ९२% अन्नधान्याचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरामधील वंदे मातरम सभागृह बंद असल्याबाबत

**(८) * १७३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये ४३ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले वंदे मातरम सभागृह देखभाल व दुरुस्ती अभावी बंद असून सभागृहामध्ये पिण्याचे पाणीही उपलब्ध नाही तसेच ४५ लाख रुपयांचे वीज बील थकीत असल्याने महावितरणने तीन महिन्यांपासून वीज पुरवठाही खंडीत केला असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सभागृह कार्यक्रमासाठी भाडेतत्वावर देण्यासाठी दीड लाख रुपयांचे शुल्क आकारण्यात येत असून भाडेतत्वावर घेणाऱ्या आयोजकालाच वीज व पाणी नसल्यामुळे जनरेटरच्या डिझेलसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोटयवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले छत्रपती संभाजीनगर शहरातील वंदे मातरम सभागृहाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाने निधीची तरतूद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

वंदे मातरम सभागृहाकरीता महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत पिण्याच्या पाण्याची सोय नळाद्वारे करण्यात आलेली असून सभागृहासाठी पाण्याची बोअर सुद्धा उपलब्ध असून त्याद्वारे २४ तास पाण्याची सुविधा उपलब्ध आहे.

डिसेंबर, २०२४ मध्ये व माहे जानेवारी, २०२५ मध्ये विविध कार्यक्रमांसाठी आयोजकांना सभागृह भाडेतत्वावर देण्यात आलेले होते.

"वंदे मातरम" सभागृहाचे माहे जानेवारी-२०२५ पर्यंतच्या विद्युत देयकाची रक्कम रूपये ४८,४४,८६०/- थकीत असल्याने महावितरण कंपनीने विद्युत पुरवठा खंडीत केलेला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शासनाने गठीत केलेल्या समितीने ठरवून दिल्याप्रमाणे सभागृहातील कार्यक्रमासाठी दीड लाख रूपयाचे शुल्क आकारण्यात येते. डिसेंबर, २०२४ मध्ये व माहे जानेवारी, २०२५ मध्ये आयोजकांनी स्वत: जनरेटरसाठी आवश्यक असलेला डिझेलचा अतिरिक्त खर्च करण्याची तयारी दर्शविलेली असल्यामुळे त्यांना सभागृह भाडेतत्वावर देण्यात आलेले होते. तसेच सभागृहामध्ये पाण्याची सोय उपलब्ध आहे.

(३) व (४) शासनपत्र दिनांक २४/०२/ २०२५ अन्वये वंदे मातरम सभागृहाचे एकूण थकीत रुपये ४८,४४,८६० विद्युत देयकापैकी रुपये १४,०१,७२०/- इतकी रक्कम अदा करणेकरीता मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडे भाडे पोटी प्रलंबित रुपये १९,५०,००० इतकी रक्कम मिळणेबाबत शासनस्तरावरून दिनांक २७/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरित देयकाच्या अदायगीसाठी पुनर्वितरण /पुनर्विनियोजन प्रस्तावाद्वारे कार्यवाही करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील विद्यार्थांच्या उच्च शिक्षणाकरीताच्या शिष्यवृत्तीचे अर्ज संकेतस्थळावर प्रलंबित असल्याबाबत

**(९) * ४१७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विद्यापीठातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी संकेतस्थळावर गेल्या ३ वर्षांपासून अर्ज प्रलंबित असल्यामुळे उच्च शिक्षणातील शिष्यवृत्तीचा लाभ न

मिळाल्यामुळे संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, महाविद्यालयांचे प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी उच्च शिक्षणातील शिष्यवृत्तीचा लाभ न मिळाल्यामुळे संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली तसेच प्रलंबित असलेल्या अर्जांचा निपटारा करण्याबाबत व विद्यार्थ्यांना महाडीबीटीमार्फत शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) उच्च शिक्षण संचालनालय स्तरावरुन त्यांचे पत्र दिनांक ३०/०४/२०२४, दिनांक १३/०६/२०२४ व दिनांक ४/१०/२०२४ अन्वये कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये यासाठी महाविद्यालय व विभागस्तरावरील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जांची तातडीने पडताळणी करणेबाबत तसेच प्रलंबित अर्जांमुळे भविष्यात उद्भवणाऱ्या प्रश्नांस सर्व विभागीय सहसंचालक, कुलसचिव, अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयांचे प्राचार्य जबाबदार राहतील अशा सुचना संचालनालय स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत.

(२) सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या तीन वर्षातील मिळून महाविद्यालयस्तरावर १८,७१४ आणि विभागस्तरावर २२,२७९ शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये निदर्शनास आले होते. विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करताना आवश्यक कागदपत्रे न जोडणे, चुकीचे कागदपत्रे ऑनलाईन सादर करणे इ. बाबींमुळे शिष्यवृत्तीचे काही अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहतात. तथापि, सदर अर्ज तातडीने पडताळणी करण्याचे निदेश दिल्यानंतर दिनांक २८/०२/२०२५ पर्यंत महाविद्यालय स्तरावर १३,९७५ व विभागस्तरावर २१,९८२ अर्जांची पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरीत अर्जांपैकी महाविद्यालय स्तरावरील ४७३९ व विभागस्तरावरील २९७ शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी सुरु आहे. या वस्तुस्थितीनुसार विद्यापीठांचे कुलसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापुर येथे टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्याबाबत

**(१०) * ९८८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ ते २०२८ जाहीर केले असून ५ वर्षात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक व ५ लाख रोजगार निर्मिती होणे तसेच खाजगी गुंतवणूक वाढविण्यासाठी लघु वस्त्रोद्योग संकुले व टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्याचे ठरविले आहे. तथापि, वस्त्रोद्योग कंपन्यांना सन २०१५ पासून अंदाजे ३ हजार कोटी रुपयांचे अनुदान मिळाले नसल्याने कंपन्या बंद पडण्याच्या मार्गावर असून सोलापुरातील १४ हजार पारंपरिक यंत्रमाग व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रातील भौगोलिक मानांकन (जीआय) मिळालेले सुबक नक्षीकाम व विशिष्ट धाग्यांनी बनलेल्या सोलापुरी चादरी हे पहिले उत्पादन असून या व्यवसायाला ओहोटी लागली असल्याने देशाच्या अन्य भागातून हुबेहूब पण निकृष्ट दर्जाच्या चादरी नक्कल करून सोलापुरी चादरी म्हणून बाजारात आणल्या जात आहेत, तसेच वस्त्रोद्योगांना पुन्हा उभारी घेणे शक्य नसल्याने वैफल्य आलेले ३० टक्के पारंपरिक यंत्रमाग व्यावसायिक आणि कामगार तेलंगणात स्थलांतरित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास २० वर्षापूर्वी सोलापुरात ३० हजार यंत्रमाग होते.त्यातील ८ हजारावर यंत्रमाग चादरी उत्पादन करत होते यातून वार्षिक रुपये ७०० कोटींची उलाढाल होत होती तर ३० हजार कामगारांना रोजगार मिळत होता परंतु सध्या फक्त १२०० यंत्रमागावर चादर तयार होते व ५ हजार कामगारांना रोजगार मिळत असून वार्षिक उलाढाल रुपये १०० कोटींपर्यंत खाली आली असून सोलापुरी चादर, टॉवेल व टेरी टॉवेलची क्रेझ आणि सोलापूर जिल्ह्यातील वस्त्रोद्योगाची सध्याची परिस्थिती पाहाता सोलापूरला टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सोलापुर जिल्ह्यातील पारंपरिक यंत्रमाग व्यवसायाला नव्याने उभारी देऊन वस्त्रोद्योग वाचवण्यासाठी तसेच सोलापूरला टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्याबाबत धोरण निश्चित करुन वस्त्रोद्योग बंद होऊ नये यासाठी कोणत्या उपाययोजना / कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे :** (१) शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२३ अन्वये, राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ जाहीर करण्यात आले आहे. या धोरणात पुढील ५ वर्षात २५,००० कोटी रुपयांची गुंतवणुक आकर्षित करणे आणि ५ लाखांपर्यंत रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

तसेच एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार शासन निर्णय दिनांक १६/०७/२०२४ अन्वये, राज्यातील प्रत्येक महसूल विभागात एक याप्रमाणे एकूण ६ टेक्नीकल टेक्सटाईल पार्क उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक ०६/०३/२०२४ अन्वये, राज्यातील सर्व ६ महसूल विभागांमध्ये प्रत्येक विभागात ३ असे एकूण १८ लघु-वस्त्रोद्योग संकुले उभारण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

शासनाने एप्रिल, २०१५ ते दिनांक २०/०१/२०२५ पर्यंत राज्यातील वस्त्रोद्योग घटकांना व्याज अनुदान तसेच भांडवली अनुदान स्वरुपात, सुमारे रुपये २०५९६१.९८ लाख इतके अनुदान मंजूर करुन वितरीत केले आहे.

सोलापूरातील १४ हजार पारंपारिक यंत्रमाग व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास वस्त्रोद्योग विभाग किंवा वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर या कार्यालयाकडे कोणतेही निवेदन/तक्रारी अर्ज/सूचना पत्र/ माहिती प्राप्त झालेले नाही.
(२), (३) व (४) बाजारपेठेतील मागणीनुसार वस्त्रोद्योगाचे उत्पादन वस्त्रोद्योग घटकांकडून घेण्यात येते. राज्य, देश व परदेशात टेरी टॉवेलची मोठ्या प्रमाणात मागणी असल्यामुळे, सोलापूर चादर उत्पादकांनी टेरी टॉवेलचे उत्पादनात वाढ केली असल्यामुळे टेरी टॉवलच्या उत्पादनात वाढ होऊन सोलापुरी चादरीचे उत्पादन घटल्याचे दिसून येते. ३० टक्के पारंपारिक यंत्रमाग व्यावसायिक आणि कामगार तेलंगणात स्थलांतरित झाल्याबाबत सहायक कामगार आयुक्त, सोलापूर कार्यालयाकडे कोणतेही लेखी निवेदन अथवा तक्रार प्राप्त झालेली नाही.

तसेच शासन निर्णय दिनांक १६/०७/२०२४ अन्वये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार राज्यातील प्रत्येक महसूली विभागात एक टेक्निकल टेक्सटाईल पार्क स्थापन करण्यासाठी गुंतवणूकदारांना आमंत्रित करण्यासाठी https://mahatextile.maharashtra.gov.in आणि https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर दिनांक १०/०१/२०२५ रोजी अभिरुचीची अभिव्यक्ती (Expression of Interest-EoI) प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर ई-निविदा दिनांक ०४/०३/२०२५ रोजी उघडण्यात आली असून या निविदेमध्ये एका निविदा धारकाने एम.आय.डी.सी., छत्रपती संभाजीनगर, जि.छत्रपती संभाजीनगर येथे टेक्निकल टेक्सटाईल पार्क स्थापन करण्यासाठी इच्छुकता दर्शविली आहे. सदर अभिरुचीची अभिव्यक्तीमध्ये नमूद अटी व शर्तीनुसार पुढील कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येत आहे.

नवीन धोरणांतर्गत झोननिहाय सहकारी यंत्रमाग घटकांना शासकीय भागभांडवल, वीज अनुदान, सौर ऊर्जा संयंत्र स्थापित करण्यासाठी भांडवली अनुदान, महाटेक्नॉलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेंतर्गत भांडवली अनुदान देण्याचा निर्णय तर खाजगी यंत्रमाग घटकांना स्थिर भांडवली गुंतवणूकीवर भांडवली अनुदान, वीज अनुदान, सौर ऊर्जा संयंत्र स्थापित करण्यासाठी भांडवली अनुदान व महाटेक्नॉलॉजी अपग्रेडेशन फंड योजनेंतर्गत भांडवली अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## देवन्हावे (जि.रायगड) येथील श्री छत्रपती विद्यालयातील शिक्षिकेने विद्यार्थ्यांना मारहाण केली असल्याबाबत

**(११) * ८५६ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवन्हावे (जि.रायगड) येथील केटीएसपी मंडळाच्या श्री छत्रपती विद्यालयातील एका महिला शिक्षिकेने विद्यार्थ्यांना मारहाण केली असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शिक्षिकेने केलेल्या मारहाणीत अनेक विद्यार्थ्यांचे हात, गाल, बोटे सुजली असून एका विद्यार्थ्याच्या हाताचे हाडदेखील तुटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने श्री.छत्रपती विद्यालयातील विद्यार्थ्यांना मारहाण करणाऱ्या संबंधित शिक्षिकेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय,

गटशिक्षणाधिकारी अधिकारी, पंचायत समिती खालापूर यांनी चौकशी केली असून सदर शिक्षिकेवर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधित संस्थेस कळविले होते. त्यानुसार संस्थेने संबंधित शिक्षिकेची बदली इतर शाळेत केली आहे. तसेच संबंधित शिक्षिकेच्या दोन वेतनवाढी रोखण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोयाबीन खरेदीसाठी हमीभाव केंद्रातील जाचक अटी रद्द करण्याबाबत

**(१२)** * **८६२ श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन नाफेडमार्फत हमीभावाने खरेदी करण्याकरीता दिनांक ६ जानेवारी, २०२५ पर्यंत नोंदणी करण्याची मुदत देण्यात आली असून सन २०२४-२५ या हंगामातील सोयाबीनचा हमीभाव निश्चित करुन हमीभावाने हमीभाव केंद्रावर सोयाबीन खरेदी करण्यात येईल असे शासनाने जाहीर केले असतानाही मागील वर्षी हमीभाव केंद्रावर प्रति हेक्टरी १६.५० क्विंटल प्रमाणेच सोयाबीनची खरेदी मर्यादा घातली असल्यामुळे सोयाबीनचे उत्पादन त्यापेक्षा अधिकचे झाल्यास सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आपला अधिकचा माल बाजारात मिळेल त्या किंमतीला विकावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यात खरेदी केंद्र आवश्यक असतानाही सांगली जिल्ह्यात शासनाने सोयाबीन खरेदीसाठी केवळ दोनच हमीभाव केंद्रांना माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये मंजूरी दिली असल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव केंद्राऐवजी अन्य व्यापाऱ्यांकडे जाऊन आपला माल विकावा लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध तांत्रिक अडचणींमुळे दिनांक १२ जानेवारी, २०२४ पर्यंत शासकीय लक्षांकाच्या २५ टक्केच सोयाबीन खरेदी करण्यात आली असून अनेक शेतकरी सोयाबीन विक्रीच्या प्रतिक्षेत असून हमीभाव केंद्रातील शासनाने घातलेल्या अनेक जाचक अटीमुळे बाजार समित्यांनी हमीभाव केंद्रे घेण्यास नकार देत असल्याचेही त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सांगली जिल्ह्यातील शेतकरी सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात घेतात हे लक्षात घेता, सध्याची १६.५० क्विंटल सोयाबीनची खरेदी मर्यादा वाढविण्याची मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकरी सोयाबीनच्या हमीभावापासून वंचित राहू नये याकरीता सांगली जिल्ह्यात हमीभाव केंद्रे वाढविण्याबाबत तसेच सध्या असलेल्या जाचक अटी काढून टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने सन २०२४-२०२५ करीता सोयाबीनसाठी प्रती क्विंटल रुपये ४८९२/- इतका हमीभाव घोषित केला असून तो मागील वर्षाच्या हमीभावापेक्षा रुपये २९२/- प्रति क्विंटल इतका जास्त आहे. दिनांक १/१०/२०२४ पासून ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरु केली असून सदर मुदत दिनांक ६/१/२०२५ पर्यंत वेळोवेळी वाढविण्यात आली. कृषी विभागाकडून प्राप्त प्रत्येक जिल्ह्यांच्या अंदाजीत उत्पादकतेनुसार शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी केली जाते. नांदेड जिल्ह्याची सोयाबीनची प्रतिहेक्टरी उत्पादकता १३०० किलो होती. त्यानुसार खरेदी प्रक्रीया राबविण्यात आली.

(२) हे खरे नाही.

सांगली जिल्ह्यात २ खरेदी केंद्रे सुरू करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाल्याने २ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) सांगली जिल्ह्यात सोयाबीन खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीचा अल्प प्रतिसाद मिळाला असून ३५६ शेतकऱ्यांकडून ५०१.१६ मे.टन इतकी सोयाबीनची खरेदी झालेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना एफआरपी वेळेत अदा करण्याबाबत

**(१३) * ९९७ श्री.हेमंत पाटील, श्री.सदाशिव खोत : तारांकित प्रश्न क्रमांक २३५०२ ला दिनांक २ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २०२४-२५ च्या ऊस गाळप हंगाम सुरू झालेला असून बाजारातील सध्या साखरेस मिळणारा दर गेल्या दोन महिन्यात रुपये ३६५०/- प्र. क्विंटलवरून रुपये ३३००/- पर्यंत घसरला आहे तसेच ऊस गाळप हंगामात दिनांक १५ डिसेंबर, २०२४ अखेरपर्यंत १२२ साखर कारखान्याकडे ऊस तोडणी वाहतूक खर्चासह देय असलेले एफआरपीचे १६८५ कोटी रुपये थकीत असल्याचे साखर आयुक्तालयाच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस उत्पादक शेतकरी वाढलेले खताच्या व मशागतीच्या दरामुळे व ऊसाची बिले वेळेत मिळत नसल्याने त्यांना कर्जाचे हप्ते वेळेत भरतां येत नसल्यामुळे बँकांचे व्याज वाढले असून एफआरपीचीही रक्कम थकीत असल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाची एफआरपी रुपये ४०००/- प्रतिटन मिळावी, तसेच एफआरपीचे थकीत रक्कम रुपये १६८५ कोटी तातडीने अदा करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांकडून सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची एफआरपीची थकीत रक्कम व ऊसाची एफआरपी रुपये ४०००/- प्रतिटन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) सन २०२४-२५ हंगामात, दिनांक १५/०२/२०२५ च्या FRP अहवालानुसार १००% एफआरपी अदा केलेल्या कारखान्यांची संख्या ६५ असून पूर्ण एफआरपी अदा न केलेल्या कारखान्यांची संख्या १३४ आहे.

हंगाम २०२४-२५ मधील ज्या साखर कारखान्यांकडे ऊस बील थकीत आहेत अशा ५९ साखर कारखान्यांविरूध्द वसुली प्रमाणपत्र (RRC) निर्गमित करण्यासंदर्भात साखर आयुक्तालय स्तरावर कार्यवाही चालु आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाची एफआरपी रुपये ४,०००/- देणेबाबत निर्णय हा धोरणात्मक व केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक पद मंजूर करणेबाबत

**(१४) *८०७ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळेत ‘शाळा प्रमुख’ म्हणून सेवा जेष्ठ शिक्षकास “मुख्याध्यापक पदी” नियुक्ती करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवा जेष्ठ शिक्षकास “मुख्याध्यापक पदी” नियुक्ती दिल्यामुळे शाळांची गुणवत्ता साधणे, शाळेचे प्रशासकीय कामकाज पाहणे, विद्यार्थी शिक्षक संस्था यांचा दुवा म्हणून प्रामाणिकपणे कार्य करणे, शासनाची अनेक प्रकारची ऑनलाइन कामे पाहणे, एकंदरीत शाळेच्या कामाची ज्यावर संपूर्ण जबाबदारी असते. अशा शिक्षकास शाळेचे मुख्याध्यापक पद असणे गरजेचे असून सन २००५ मध्ये हे पद शासनाने बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००५ पासून संच माहितीमधील मुख्याध्यापक हे पद काढले असून पूर्वी मंजूर असलेल्या मुख्याध्यापकांस सेवानिवृत्तीनंतर शासनाच्या सवलती मधील रजा रोखीकरणाचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राथमिक शाळेला मुख्याध्यापक पद मंजूर करण्याबाबत व त्यांच्या रजा रोखीकरणाचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम क्र. १६ च्या उपनियम १८ अन्वये माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना अर्जित रजेचे रोखीकरण अनुज्ञेय आहे. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांना अर्जित रजेचे रोखीकरण देणेबाबत या नियमावलीमध्ये तरतूद नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र विभागाच्या एमए अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना दोन वेगवेगळ्या प्रश्नपत्रिका दिल्याबाबत

**(१५) * १०२८ श्री.विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्र (सीडीओई) विभागाच्या एम.ए. अभ्यासक्रमाच्या मराठीच्या परीक्षेत एकत्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन वेगवेगळ्या प्रश्नपत्रिका देण्यात आले असून त्यांचे प्रश्नपत्रिका कोड व विषय कोड वेगळे असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी विभागाच्या एम.ए. मराठी नियमित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या प्रश्नपत्रिका सीडीओईच्या विद्यार्थ्यांना देण्यात आला तर सीडीओईच्या अन्य केंद्रांवर परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसरा म्हणजेच सीडीओईने तयार केलेली प्रश्नपत्रिका देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने विद्यापीठाच्या या निष्काळजीपणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने एम.ए. अभ्यासक्रमाच्या मराठीच्या परीक्षेत एकत्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन वेगवेगळ्या प्रश्नपत्रिका देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रावरील १० विद्यार्थ्यांना दुरस्थ व ऑनलाईन विद्यार्थ्यांसाठीच्या एम.ए. मराठी प्रश्नपत्रिकेऐवजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठीची प्रश्नपत्रिका वितरीत करण्यात आली.
(३) याबाबत मुंबई विद्यापीठाने संचालक, दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र (CDOE) यांच्याकडून खुलासा घेऊन ही बाब परीक्षा व मुल्यमापन मंडळापुढे दिनांक ०७ फेबुवारी, २०२५ रोजी ठेवली त्यावर परीक्षा व मुल्यमापन मंडळाने ज्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रावर असे घडले असेल त्या केंद्रावरील प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्यांना अधिकचे सरसकट १५% गुण देण्याचा निर्णय घेतला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामात विविध बँकांनी केवळ सहा टक्के पीक कर्ज वाटप केल्याने शेतकऱ्यांची गैरसोय झाल्याबाबत

**(१६) * १२३१ श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामात विविध बँकांनी केवळ सहा टक्के पीक कर्ज वाटप केल्याने शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात बँकांना दिलेल्या उद्दिष्टांपैकी केवळ ६ टक्के व लातूर विभागात मध्यवर्ती सहकारी बँकेने ४२ टक्के तर राष्ट्रीयकृत बँकांनी पीक कर्ज वाटप करण्यास उदासीनता दाखविलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रब्बी हंगामात पीक कर्ज वाटप करण्याबाबत विविध बँकांना दिलेले उद्दिष्ट पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत, तसेच उद्दिष्ट पूर्ण न करण्याऱ्या व पीक कर्ज वाटप न करणाऱ्या संबंधित बँकावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) हे खरे नाही,

राज्यामध्ये सन २०२४-२५ साठी खरीप व रब्बी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक रुपये ७४,७८१ कोटी असून त्यापैकी रब्बी पीक कर्ज वाटपासाठी रुपये २१,२५१ कोटी रकमेचा लक्षांक आहे. रब्बी हंगामासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सार्वजनिक क्षेत्र/खाजगी लघुवित्त बँका तसेच ग्रामिण बँकांमार्फत दिनांक १५/०२/२०२५ पर्यंत रुपये १७,७४२ कोटी पीक कर्ज वाटप केले आहे.

सन २०२४-२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये रब्बी पीक कर्ज वाटपाचे प्रमाण ५७ टक्के आहे व लातूर जिल्ह्यात रब्बी पीक कर्ज वाटपाचे प्रमाण ८४ टक्के आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा हिस्सा ३० टक्के आहे व व्यापारी बँकांचा हिस्सा ७० टक्के आहे.
(३) राज्यस्तरीय बँकर्स समिती तसेच कृषी उप समितीच्या सभेमध्ये रब्बी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत बँकांना सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत मार्च २०२५ अखेर रब्बी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत संनियंत्रण करण्यात येत आहे.

राज्यातील विविध बँकांनी रब्बी पीकासाठी वाटप केलेल्या कर्ज वाटपाचे प्रमाण ७७ टक्के आहे. त्यामुळे बँकांना रब्बी हंगामात पीक कर्ज वाटप करण्याबाबत दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले नाही, ही वस्तुस्थिती आहे. उद्दिष्टाप्रमाणे पीक कर्ज वाटप करण्याबाबत दिनांक २५/०२/२०२५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत सर्व बँकांना निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यामध्ये ग्रामपातळीवरील दक्षता समितीची स्थापना करण्याबाबत

**(१७) * १२८२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील १११ स्वस्त धान्य दुकानातील ग्राम पातळीवरील दक्षता समित्यांतील अध्यक्ष, सचिव, सदस्य निवडले गेले नसल्याने स्वस्त धान्य दुकानातील दक्षता समिती केवळ कागदोपत्री असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्राम पातळीवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर स्वस्त धान्य दुकानांतून वितरण करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तुंवर देखरेख ठेवण्याकरीता या समितीची स्थापन करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोहाडी तालुक्यात १११ स्वस्त धान्य दुकानातील ग्राम पातळीवरील दक्षता समित्यांची स्थापना केली नसल्याने अनेक रेशन दुकानांमध्ये बुरशी चढलेला मातीयुक्त व रंगही बदललेला निकृष्ट दर्जाच्या गव्हाचे वितरण केले असून जीवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मोहाडी तालुक्यात दक्षता समित्यांची स्थापना करून अध्यक्ष, सचिव, सदस्य निवडण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच निकृष्ट दर्जाच्या गव्हाचे वितरण करणाऱ्या अधिकारी व पुरवठादाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अजित पवार :** (१) अंशत: खरे आहे.

मोहाडी तालुक्यात एकूण ७५ ग्रामपंचायती असून सन २०२३ मध्ये ५८ ग्रामपंचायत निवडणूक पार पडलेल्या आहेत. सदर दक्षता समिती गठीत करण्याबाबत सर्व ग्रामपंचायत यांना दिनांक १७/०१/२०२४ व दिनांक ०७/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, मोहाडी यांनी कळविले. त्यास अनुसरुन ८ ग्रामपंचायतीचे ठराव प्राप्त असून त्यानुसार ८ दक्षता समिती गठीत केल्याचे आदेश पारीत केले आहेत. उर्वरित ग्रामपंचायात यांचेशी दक्षता समिती स्थापन करण्याबाबत तहसिलदार, मोहाडी यांचेकडून पत्रव्यवहार सुरु आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

रेशन दुकानांमध्ये बुरशी चढलेला मातीयुक्त व रंगही बदललेला निकृष्ट दर्जाच्या गव्हाचे वितरण झालेले नाही. तसेच रेशनचा गहू हा लाभार्थ्यांना ई-पॉस मशिनद्वारे वितरीत केला जातो. धान्याचा शिल्लक साठा मशिनवर दिसत असल्याने काळाबाजार झालेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सुमारे ९ लाख मुले शाळाबाहय असल्याबाबत

**(१८) * १५०४ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या युडीआयएसईच्या आकडेवारीनुसार सन २०२३-२४ मध्ये सरकारी शाळांमधील पटसंख्येत मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली असून शासनाच्या स्टुडंट पोर्टलवर ९ लाख मुलांच्या गळतीची नोंद झाली असल्याने सर्वाधिक गळती ठाणे आणि पुणे जिल्ह्यात असल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यात मागासवर्गीय गटांच्या विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण किती आहे, तसेच निरंतर शिक्षण पध्दतीमध्ये एका वर्गातील विद्यार्थी हे दुसऱ्या वर्गात जाताना पटसंख्या वाढायला हवी किंवा तशीच राहायला हवी परंतु ती कमी असल्यास बाहेर पडलेले विद्यार्थी नेमके कुठे गेले हे शोधण्यासाठी शिक्षण विभागाकडून मिशन ड्रॉप बॉक्स ही पध्दत राबवली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी शिक्षण विभागाकडून शाळांमध्ये शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली जाते तसेच शिक्षण विभागाच्या स्टुडंट पोर्टलवर नोंद असणारी शाळाबाह्य मुलांची आकडेवारी लाखात तर ड्राफ्ट ड्रॉप बॉक्समध्ये तब्बल ९ लाख ७५ हजार मुले असून त्यात सर्वाधिक मुले ठाणे व पुणे जिल्ह्यात आढळली त्यामुळे शिक्षण विभागाकडून शाळा आणि मुख्याध्यापकांना ड्रॉप बॉक्स शून्यावर आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, ड्रॉप बॉक्स शून्यावर आणण्यात बऱ्याच अडचणी असून ते प्रत्यक्षात शक्य नसल्याने शिक्षण विभागाकडून नोंदीसाठी पर्याय सुचवणे आवश्यक असल्याचे मत तज्ञ व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) ड्रॉप बॉक्स कमी/शून्य करणेसंदर्भात नियमित व्ही.सी. घेवून तांत्रिक अडचणी दूर करण्यात येतात. मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेच्या ड्रॉप बॉक्समधील विद्यार्थी शून्य करण्यासाठी सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांना नियोजन करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(४) राज्य शासनाकडून समग्र शिक्षा योजनेंतर्गत केंद्र शासनाकडे २०२५-२६ वार्षिक नियोजन व अंदाजपत्रकामध्ये विद्यार्थ्यांकरीता वाहतूक सुविधा, मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक सुविधा, इ. सुविधा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.पुणे) येथील एकाच कुटुंबातील तिघांनी सावकाराच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(१९) * १९३२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.पुणे) येथील एकाच कुटुंबातील तिघांनी सावकाराच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागात कायद्याची पायमल्ली करून अद्यापही सावकारी सुरु असून सर्वसामान्य जनतेभोवती कर्जाचा पाश आवळला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर प्रकरणातील संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे आहे. चिखली पोलीस स्टेशन मध्ये नोंदविलेल्या लेखी तक्रारीनुसार एकाच कुटुंबातील तिघांनी सावकाराच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चिखली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं.३२/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे

कलम १०८, ३५२, ३५१(२), ३(५) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ३९, ४५ अन्वये दिनांक १८/०१/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे
(२) हे खरे नाही.
(३) सदर दाखल गुन्हयातील तीन आरोपींना अटक करुन त्यांची पोलीस कस्टडी व न्यायालयीन कस्टडी घेण्यात आलेली असून सध्या सदर आरोपी हे येरवडा कारागृह येथे न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर दाखल गुन्हयातील अन्य महिला आरोपीचा शोध सुरू आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) चिखली पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड हे करीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिनांक १ नोव्हेंबर २००५ पुर्वीच्या विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांतील कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगाचे हप्ते मिळाले नसल्याबाबत

**(२०) * ३३७ श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक २३०७८ ला दिनांक ५ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे मार्च २०१४ पासून भविष्य निर्वाह निधी खाते अचानक बंद करण्यात आले असल्यामुळे त्यांना भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या व हिशेब मिळाले नाहीत तसेच सातव्या वेतन आयोगाचे हप्ते मिळाले नसल्याचेही माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे मार्च, २०१४ सालापासून भविष्य निर्वाह निधी खाते सुरू करण्याबाबत तसेच भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या व हिशेब मिळण्याबाबत व सातव्या वेतन आयोगाचे हप्ते मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी नियुक्त विनाअनुदानित व अंशतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी डिसीपीएस योजनेस पात्र असल्याने त्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते बंद करण्यात आलेले आहेत.
(२) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीच्या अंशतः अनुदानित पदावरील कर्मचारी डिसीपीएस पात्र असल्याने भविष्य निर्वाह निधी खाते अनुज्ञेय नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सफाई कामगारांच्या विविध मागण्यांबाबत

**(२१) * ५९६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सफाई कामगारांनी आपल्या विविध १७ मागण्यांचे निवेदन देऊन बाजार समितीच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी,२०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समितीतील शेकडो सफाई कामगार शासनाच्या विविध योजनेपासून वंचित राहत असल्याचेही त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सफाई कामगारांनी केलेल्या १७ मागण्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
कामगार आयुक्त कार्यालयातर्फे वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकानूसार अनुज्ञेय वेतन संबंधित लाभ कामगारांना अदा करण्यात येतात. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती येथे कंत्राटदारामार्फत कंत्राटी सफाई कामगारांची नियुक्ती करण्यात आली असून संबंधित कंत्राटदारांना कामगार हितकारणी सभा संघटनेच्या दिनांक ०६/०१/२०२५ रोजीच्या निवेदनाची दखल घेऊन सफाई कामगारांच्या मागण्यांवर आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश बाजार समितीच्या प्रशासनाने दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ व महामंडळाच्या पुरवठा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२२) *८३६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ (महाटेक्स) व महामंडळ यांना दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या सुधारित खरेदी नियमांनुसार हातमागाच्या ११ वस्तूंचा पुरवठा करण्याचे अधिकार शासनाने दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महासंघ आणि महामंडळाने स्वतःचे उत्पादन न करता बाहेरील राज्यातून विभागांना पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा निकृष्ट असल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उद्योग विभागाने साहित्याचा दर्जा न तपासता दर निश्चितीमध्ये दिलेल्या विनिर्देशांमध्ये त्रुटी असून चादर व बेडशीट यांच्यातील जाड व पातळपणाच्या फरकामुळे सदर साहित्याचा निकृष्ट पुरवठा केल्याने गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने महासंघ आणि महामंडळाला देण्यात आलेले कार्यादेश रद्द करून त्यांचा समावेश काळ्या यादीत टाकून

सबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाचे हातमाग आरक्षण कायदा १९८५ व त्यापुढील सुधारणा दिनांक २६ जुलै, १९९६ नुसार महामंडळ व महासंघामार्फत खरेदी करावयाच्या ११ वस्तुंना राखीव ठेवण्यात आले आहे. उद्योग विभागामार्फत सन १९९२ पासून हातमाग कापडाची शासन दरनिश्चिती करण्यात आलेली आहे. दिनांक १/१२/२०१६ च्या सुधारित खरेदी नियम पुस्तिकेतील दिशानिर्देशानुसार C.S.P.O. मार्फत हातमाग कापडाची दरनिश्चिती करण्यात येत असून त्यानंतर वेळोवेळी होणाऱ्या सुधारणानुसार दरनिश्चिती करण्यात आलेली आहे. उद्योग संचालनालयामार्फत दिनांक १९/१०/२०२३ रोजीच्या आदेशान्वये हातमाग कापडाची दरनिश्चिती करण्यात आलेली आहे.

(२) महासंघाकडे राज्यभरातून ५१३ प्राथमिक हातमाग विणकर संस्था नोंदणीकृत आहेत. त्यांच्यामार्फत हा महासंघ उत्पादन घेवून मागणीदार विभागांना चांगल्या दर्जाचा पुरवठा करतो. त्यामुळे बाहेरील राज्यातून विभागांना पुरवठा केला जात नाही. तसेच हातमाग महामंडळाला कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने राज्यातील कुशल व इच्छुक विणकरांना रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता गुथ्था पध्दतीवर चांगल्या दर्जाचे कापड उत्पादन करण्यास प्रोत्साहन देणे सुरु आहे. गुथ्था अंतर्गत उत्पादन घेण्याचे दृष्टीने नागपूर, उमरेड, पवनी, पालांदूर, आंधळगांव, मोहाडी, मोवाड, खापा, कामठी, सोलापूर इ. ठिकाणी येथील विणकरांना गुथ्था पध्दतीवर सूत पुरवठा करून उत्पादन घेणे सुरु आहे. यासाठी विणकरांना उधारीवर सूत पुरवठा करण्यात येत आहे. तसेच उत्पादित वाणाकरीता लागणारी विणकरी साहीत्य सुध्दा विणकरांना पुरवठा करण्यात येत आहे. अशा पध्दतीने हातमाग महामंडळ उत्पादन घेवून मागणीदार विभागांना चांगल्या दर्जाचा पुरवठा करतो. त्यामुळे बाहेरील राज्यातून विभागांना पुरवठा केला जात नाही.

(३) उद्योग विभागामार्फत साहित्याचा दर्जा तपासूनच दरनिश्चिती केलेली आहे. आवश्यकतेनुसार पुरवठा करण्यात येणाऱ्या मालाची शासनाने नियुक्त केलेल्या प्रयोगशाळेकडून नियमित तपासणी करण्यात येत असते. तसेच दर निश्चितीमध्ये दिलेल्या विनिर्देशामध्ये कोणतीही त्रुटी नसुन मागणीदार विभागांच्या मागणीनुसार स्पेसिफिकेशननुसार त्यांना चादर व बेडशिटचा पुरवठा केला जातो. याबाबत मागणीदार विभागाकडुन कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) लागू नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्राध्यापकांच्या भरती प्रक्रियेबाबत

**(२३) * ४१४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ९२ प्राध्यापकांच्या भरतीसाठी जाहिरात देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राध्यापकांच्या भरतीची नियुक्ती प्रक्रिया शासनाकडून थांबविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही नियुक्ती प्रक्रिया पुन्हा सुरु केल्यास जुन्या अर्ज केलेल्या उमेदवारांचा विचार केला जाईल अथवा नव्याने पुन्हा नवीन अर्ज मागविण्यात येणार आहेत, याबाबत उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन प्रलंबित असलेली भरती प्रक्रिया पुन्हा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागातील व विद्यापीठ संचलित लक्ष्मीनारायण तंत्रशास्त्र संस्थेतील एकूण ९२ शिक्षकीय पदांची एकत्र जाहिरात दिनांक १२ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.
(२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संचलित, लक्ष्मीनारायण तंत्रशास्त्र संस्था, विद्यापीठातून विभक्त होऊन तिचे रुपातंर लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठात झाले आहे. दोन्ही विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा वेगवेगळा आकृतिबंध मंजूर करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही चालू असल्याने पदभरतीसंदर्भात कार्यवाही करण्यात आली नाही.
(३) आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.
(४) दोन्ही विद्यापीठांकरीता स्वतंत्र आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर पदभरतीसंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत

**(२४) *९९९ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने इयत्ता १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत निर्णय घेतला असून याबाबत सर्व शाळांना सूचना देण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याने विद्यार्थ्यांच्या पाठिवरील दप्तराचे ओझे अद्यापही कमी झाले नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घरापासून शाळेपर्यंत एक ते दोन किलोमीटर अंतरावर जावे लागत असल्यामुळे त्यांच्या पाठीवरील आठ ते दहा किलो दप्तराच्या ओझ्यामुळे विद्यार्थांना पाठदुखी, मणक्याचे आजार, मुलाच्या वाढीवर परिणाम, मानसिक ताण, गुडघेदुखी, सांधेदुखी इत्यादी आजाराला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने विद्यार्थ्यांच्या पाठिवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयाची अंमलबाजवणी न करणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली तसेच विद्यार्थांचे दप्तराचे ओझे कमी करण्याच्या निर्णयाची काटेकोरपणे अंलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०२३ अन्वये सन २०२३-२४ करीता इयत्ता २ री ते इयत्ता ८ वी च्या पाठ्यपुस्तकांमध्ये वह्यांची पाने समाविष्ट करण्याबाबत व पाठ्यपुस्तके एकात्मिक स्वरूपात एकूण ४ भागांमध्ये विभागून तयार करण्याबाबत प्रायोगिक तत्वावर निर्णय घेण्यात आला होता.परंतु, याबाबत अपेक्षित फलनिष्पत्ती प्राप्त न झाल्यामुळे शासन निर्णय दिनांक २५/०१/२०२५ अन्वये सदरचा प्रयोग पुढे कायम न ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडवली (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) गावातील मराठी शाळेच्या नवीन इमारतीत वीज जोडणी करण्याबाबत

**(२५)** * **१०३० श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवली (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) या गावातील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनाला एक वर्षाचा कालावधी होऊनही सदर शाळेच्या इमारतीमध्ये अद्यापही वीज जोडणी न केल्याने विद्यार्थ्यांच्या वर्ग खोल्यामध्ये अंधार होत असून ई-लर्निंग आणि डिजिटल शिक्षणाच्या उपक्रमांमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत वडवली हे गाव संसद आदर्शग्राम योजना अंतर्गत दत्तक घेतलेले असतानाही अशी परिस्थिती उद्भवल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वडवली जिल्हा परिषदेच्या शाळेतील वर्ग खोल्यात वीज जोडणी तात्काळ करून या शाळेला कायमस्वरूपी मुख्याध्यापक देण्यासाठी व इतर सोयी सुविधा पुरवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) विजे अभावी शाळेमध्ये अंधार असल्याची बाब खरी नाही. सी.एस.आर फंडातुन रिलायन्स फाउन्डेशन, नागोठणे यांनी सदरील शाळेची नवीन इमारतीचे बांधकाम केले असून उर्वरित विद्युतीकरण व इतर कामे सी.एस.आर फंडातून रिलायन्स फाउन्डेशन पूर्ण करून देणार आहेत. तसेच सद्य:स्थितीत नविन इमारतीत जुन्या इमारती मधुन वीजपुरवठा सुरू आहे.
(२) सद्य:स्थितीत नविन इमारतीत जुन्या इमारती मधुन वीजपुरवठा सुरू आहे. मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रियेनंतर प्राधान्याने वडवली जिल्हा परिषदेच्या शाळेचे मुख्याध्यापक पद भरण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी सिबिल स्कोरचे बंधन रद्द करण्याबाबत

**(२६) * १५३१ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी सिबिल स्कोअरचे बंधन घालू नये असे रिझर्व बँकेचे निर्देश असतानाही राष्ट्रीयकृत बँका अद्यापही अट लावत असल्याने शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतल्यावर त्याच पिकाच्या उत्पादनातून हे पीक कर्ज भरण्यात येते परंतु एखाद्या वेळेस नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा इतर काही कारणाने पीक न आल्यास किंवा वाया गेल्यास शेतकरी पीक कर्ज भरण्यास असमर्थ ठरतो परिणामी पीक कर्ज थकीत होत असल्याने शेतकऱ्यांचा सिबिल स्कोर खराब होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना सिबिल स्कोरची अट न लावता पीक कर्ज द्यावे असे पत्र सहकार आयुक्त यांनी राज्यातील बँकर्स कमिटीस पाठवले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने सर्व बँकांना/बँकर्स कमिटीच्या आढावा बैठक घेऊन पीक कर्जासाठी लावण्यात येत असलेली सिबिल स्कोअरची अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) हे खरे नाही,

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक २८/०१/२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये बँकांनी कर्ज मंजूर करताना संबंधित कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचा दाखला (No Dues Certificate) घेण्याऐवजी संबंधित कर्जदाराची पत, परतफेड क्षमता व परतफेडीचा भुतकालीन व्यवहार इ. बाबी तपासण्यासाठी सिबिल अहवालाचा वापर करण्याबाबत सूचित केले आहे. सदर सुचनेनुसार बँकेमार्फत शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजूर करताना सिबिल स्कोअर विचारात न घेता, सिबिल अहवाल विचारात घेण्यात येतो.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मा.मुख्यमंत्री महोदय यांनी राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या दिनांक २५/०६/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये व्यापारी बॅकांना पीक कर्जासाठी सिबिलची सक्ती न करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या सुचनेनुसार राज्यस्तरीय बँकर्स समितीने दिनांक ०८/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व सदस्य बँकांना याबाबत सूचना दिल्या असून त्यानुसार बँक स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नारेगाव (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील अब्दुल हमीद पटणी उर्दू प्राथमिक शाळेच्या व्यवस्थापनाने जास्तीची पटसंख्या दाखवून अनुदान प्राप्त केले असल्याबाबत

**(२७) * १२९७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारेगाव (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील अब्दुल हमीद पटणी उर्दू प्राथमिक शाळेच्या व्यवस्थापनाने जास्तीची पटसंख्या दाखवून शासनाकडून अनुदान प्राप्त केले असल्याची बाब माहे जानेवारी,

२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रारी केल्यानंतर केलेल्या चौकशीमध्ये पटसंख्येपैकी कमी विद्यार्थी शाळेत हजर राहणे, प्रवेश अर्जाच्या अपूर्ण नोंदी, पालकांच्या सह्या नसणे, सन २०१९-२० पासून प्रवेश निर्गम रजिस्टर अद्ययावत नसणे याप्रकारच्या अनेक त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शाळेस इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत दोन तुकड्यांना मंजूरी असूनही दोन्ही तुकड्यांचे विद्यार्थी एकाच वर्गात बसविण्यात येत असून इयत्ता आठवीच्या वर्गास मान्यता नसतानाही अतिरिक्त वर्ग भरविण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने जास्तीची पटसंख्या दाखवून शासनाची फसवणूक करणाऱ्या अब्दुल हमीद पटणी उर्दू प्राथमिक शाळेच्या व्यवस्थापनावर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर शाळेबाबत प्राप्त तक्रारी व वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने तपासणी केली असता, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमाच्या तरतूदींचा भंग व इतर अनियमितता आढळून आल्या आहेत.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर शाळेची पटसंख्येनुसार विद्यार्थी उपस्थितीचे प्रमाण कमी असल्याचे दिसून आले. तसेच शाळेमध्ये भौतिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता समाधानकारक नसल्याचे दिसून आले. त्यानुसार, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम-२०११ कलम १२ (ख) नुसार, शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत दिनांक १४/०२/२०२५ अन्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.